# गो.पु.देशपांडे यांची प्रायोगिक नाटके

माधवी महेश पोफळे –टिपरे

समाजश्री प्रशांमदादा हिरे कनि ठ महाविद्यालय,

रावळगाव, ता. मालेगाव, जि. नाशिक

मराठी नाट्यक्षेत्रात गो.प.देशपांडे यांनी आपल्या नाटयलेखनाने एक वेगळाच प्रवाह निर्माण केला आहे. त्यांची नाटके दिपस्तभांची काम करताना दिसतात. त्यांनी आपल्या नाटकातून राजकीय जाणीवांचा विचार मांडला आहे. हा विचार मांडत असताना त्यात जाणवणा—या अपरिहार्य सामुहिकतेचा आणि त्या समुहाचे असणा—या राजकारणाचाही आढावा घेतला आहे. राजकारणात दिसून येणा—या राजकारणाचाही आढावा घेतला आहे. राजकारणात दिसन येणाय्रा व्यक्तीचे खाजगी जीवन, त्यांना दिले जाणारे सामाजिकपण, राजकीय संदर्भ व सांस्कृतिक परिस्थिती यांचा शोध त्यांनी आपल्या लेखनातुन घेतला आहे. यातुन त्या व्यक्तीच्या जीवनात निर्माण होणारा गुंता त्यांनी सह्दयतेने हळुवारपणे सोडविणयाचा केलेला प्रयत्न व त्या व्यक्तीची होणारी मानसिक अवस्था यांचे दर्शन त्यांच्या नाटकातून होते.

उद्ध्वस्त धर्मशाळा, अंधारयात्रा, चाणक्य विष्णुगुप्त मामकः, पांडवाश्चौव, असा नवरा सुरेख बाई, एक वाजुन गेला, सत्यशोधक रस्ते, म्युझिक सिस्टिम ही नाटके गो.पु.देशपांडे यांनी लिहिली. गो. पु. देशपांडे यांना राजकीय – सामाजिक परिस्थितीची विलक्षण जाण असणारे ते नाटककार होते.

गो.पु. देशपांडे यांच्या नाट्यलेखनाने एक वेगळाच प्रवाह निर्माण केला आपल्या नाटकांतुन राजकीय सामाजिक आणि सांस्कृतिक परिस्थिती यांचा शोध घेतला. गो.पु. देशपांडे यांची प्रायोगिक नाटके यांचा प्रस्तुत ठिकाणी शोध घेण्याचे योजिले आहे.

उद्ध्वस्त धर्मशाळा या नाटकातील श्रीधर हा विद्यापीठात प्राध्यापक आहे. त्याने क्रांतिकारी शिक्षक संघटनाश नावाची संघटना स्थापन केल्याने त्या आवारात शांतता नाहीशी होत असल्याचा आरोप त्याच्यावर ठेवला जातो. यासाठी समिती नेमली जाते. आणि या चौकशीतुन हे नाट्य उलगडत जाते. या नाटकात चौकशी हे रूप वापरले आहे. या चौकशीतून श्रीधर व त्याच्या वडिलांशी असणारे संबंध, श्रीधरचे व सरस्वतीचे वैवाहीक जीवन, माधवीशी श्रीधरचे असणारे संबंध यांचे विश्लेषण केले जाते. या चौकशीचा राजकारणाशी संबंध असल्याने एखाद्या व्यक्तीला किंवा त्याच्या व्यक्तिमत्वाला कसे बरबाद करायचे, हे त्यांना चांगलेच माहित आहे.

या नाटकाचे दोन अंक आहेत. पहिल्या अंकात पाच दृश्ये व दुसऱ्या अंकात चार दृश्ये। येतात. या नाटकात फ्लॅश बॅक तंत्राचाही वापर केला गेला आहे. या तंत्राने वर्तमान व भूतकाळ। या दोन पातळया जोडण्याचे काम होते. या तंत्राद्वारे श्रीधरने आपल्या वडिलांशी, सरस्वतीशी। आणि माधवीशी असणारे नाते दाखविले जाते म्हणजे या नाटकात येणारे तंत्र गरज म्हणूनच येते. श्रीधर हे एकच एक पात्र संपुर्ण नाटकात वावरताना दिसते. फ्लॅश बॅक मधून घडणारी तीन दृश्ये सोडली तर बाकी दृश्यामधये पात्रच आपल्या जागेवर बसून बोलत राहतात.

अंधारयात्रा हे गो.पु. देशपांडे यांचे राजकीय नाटक आहे. वसुंधरा हे पात्र नाटकाचा केंद्रबिंदु आहे. वसुंधरा भोवती दौलतराव, श्रीपाद अश्वत्थ आणि परिक्षित ही पात्रे फिरताना दिसतात. वसुंधरा आणि परिक्षिता या दोघांचे लग्न होते. परिक्षित वसुंधरा सुंदर असण्याचा उपयोग करून घेतो. वसुंधरा पुर्वी मॉडेलींग करत असते तर दुसरीकडे संस्कृतमधुन एम.ए करत असते. परिक्षिताच्या इच्छेने ती प्रथम दौलतराव या पुढाऱ्याकडे जाते तेव्हा दौलतराव तिच्याशी लग्न करण्यास तयार असुनही ती तयार होत नाही. काही काळाने परिक्षिताशी वसुंधरा घटस्फोट घेते. ती आपले आयुष्य स्वतंत्रपणे जगायचे ठरविते. यातुनच पुढे श्रीपाद येतो. श्रीपाद तिच्याशी लग्न करण्यास तयार होतो पण ती त्याच्याशी लग्न न करता दौलतराव व श्रीपाद यांच्या बरोबर तसेच संबंध ठेवते. तिच्याकडे संस्कृत शिकायला येणाऱ्या अश्वत्थर मात्र ती मनातुन मुलाप्रमाणे प्रेम करू लागते.

या नाटकाचे दोन अंक असुन पहिल्या अंकात चार प्रवेश व दुसऱ्या अंकात पाच प्रवेश आहेत. दुसऱ्या अंकातील सुरूवातीला दौलतरावांची चार भाषणे ही चार भाषणे म्हणजे संस्कृत

नाटकातुन येणाऱ्या विष्कंभकाप्रमाणे येथे आली आहेत. या नाटकाच्या सुरूवातीला येणारी नटी ही सुत्रधाराचेच काम करताना दिसते. या नाटकात फ्लॅश बॅक तंत्राचा वापर केला आहे, त्याचप्रमाणे स्वगत, नाटयसंगीत, वादयसंगीत, मारवा श्लोक अशा संगीताचा वापर करून घेतला आहे.

चाणक्य विष्णुगुप्त या नाटकात त्यांनी सुत्रधाराच्या रूपात येणाऱ्या आणि प्राचीन काळात प्रेक्षकांना घेऊन जाणाऱ्या द्रष्टा या पात्राची योजना केली आहे. वैदिक विरूध्द अवैदिक हा भारतीय संघर्ष विष्णगुप्ताचा लक्षात येणे हे या नाटकाचे आशयसूत्र आहे. चंद्रगुप्त मौर्या सम्राट झाल्यानंतर आश्वलायनाच्या विहारात जाऊन बौध्दांचे मौर्याविषयी असणारे गैरसमज दूर करण्याचा प्रयत्न करतो. विष्णुगुप्त या नाटकात स्वत:ला पराभूत संस्कृतीचा सिध्दांत द्रष्टा। म्हणवुन घेतो. राजकीय सत्ता हा महत्वाचा विषय आहे. सुवासिनीने चंद्रगुप्तावर असणारे प्रेम चाणक्यामुळे उधळुन लावले व यामुळेच चंद्रगुप्त विष्णुगुप्त चाणक्याच्या हातचे बाहुले बनला. सवासिनी नंदाशी लग्न करते पण ती लवकरत विधवा बनते.

हे नाटक दोन अंकी आहे. पहिल्या अंकात अठरा प्रेवशतर दुसऱ्या अंकात तेरा प्रेवश । आहे. या नाटकात द्रष्टा सुत्रधाराचे काम करतो. या नाटकातून संस्कृत श्लोक, मंत्र, ऋग्वेदातील ऋचा, समूहगीत, राजदारी संगीत, बौध्द भिक्षची प्रार्थना यांचा वापर केला आहे.

मामका: पाण्डवाश्चौव या नाटकात आप्पा आणि भास्कर यांचा संघर्ष दाखविला आहे. आप्पा हे वयाने आणि विचाराने पोक्त आहेत. त्यांनी आपल्या आयुष्याचे नियोजन करताना अतिशय संयमपूर्वक केले आहे. जेव्हा आप्पा बाल्टिमोरला परत जायचं असं सांगतात तेव्हा भास्कर त्यांना सरळ सरळ विरोध करतो तर आई मनात नसतानाही आप्पांच्याबरोबर जाण्यास तयार होते. यातुन आंतर्विरोध स्पष्ट होत जातो.

या नाटकाचा एक अंक असून त्यात तीन प्रवेश आहेत. हे ही नाटक चर्चात्मक आहे. यातुन संगीताचे वेगवेगळे प्रकार हाताळले आहेत. या नाटकातुन टेपरेकॉर्डवर रेकॉर्ड केलेले मागील संवाद ऐकविले आहे. तो या नाटकाच्या संहितेतील एक भाग म्हणुन येतो.

एक वाजून गेला हे नाटक आशय आणि तंत्राच्या बाजूने वेगळेपण घेवून येणारे आहे. हे संपुर्ण नाटक नाना या पात्राभोवती फिरत राहते. उमा ही नानांची मुलगी तिचे व नानांचे वैचारिक मतभेद तीव्र असूनही तिला नानांच्या बद्दल आदर आहे. हे नाटक दोन अंकी आहे. नाटकातून निर्माण होणारा ताण राजकीय दृष्टीकोनातून कला, समाजसंस्था आणि व्यक्ती यामध्ये निर्माण होतो. माणसामाणसांमध्ये घडून येणारा संवाद कमी होत असल्याने त्यांची एकमेंकासमोर आल्यावर होणारी अवस्था, आपण स्विकारलेला मार्ग चूक की बरोबर यावरच चर्चा होत राहते। त्यातुन निष्पन्न काहीच होत नाही.

या नाटकात पॉप म्युझिक, भैरवी, ठमरी, आरती वेगवेगळ्या संगीताचा उपयोग करून घेतला आहे.

गो. पु.देशपांडे यांनी त्यांच्या बहुतांश नाटकामध्ये स्वगतांचा फार चांगल्या प्रकारे उपयोग केला आहे. माणसामाणसातील विसंवाद, माणसांमाणसातील संघर्ष, द्विधा मनस्थितीचे दर्शन, पात्रांची मनोभुमिका, सुत्रधार, विष्कभक, द्रष्टा यांच्यामार्फत प्रेक्षकांपर्यंत पोहोचतो. या स्वगतामधुनही आशावादाचा प्रत्यय वारंवार डोकावत राहतो.

गो.पु.देशपांडे यी समकालीन सामाजिक राजकीय प्रश्नांची मांडणी केली आहे. ही मांडणी करत असताना इतिहास पुराणकथा, जातके यांचा आधार घेऊन प्रभावीपणे मांडणी केली आहे. गो.पु. देशपांडे यांच्या नाटयनिर्मितीद्वारे घश्*ॅ नंतरच्या कालखंडात नव्या आशयकृती आणल्या. श्सत्तासंघर्षश आणि श्मूल्यसंघर्षश याची मांडणी करून प्रेक्षकांना मुल्यात्मकतेचे भान देतात. मराठी भाषेचे उत्कृष्ट जाण असणारे आणि भाषेचा परिणामकारक वापर करणारे आधुनिक काळातील एक महत्वाचे नाटककार म्हणून त्यांचे योगदान महत्वाचे वाटते.

संदर्भ

१. प्रा.रमेश साळुखे – नाटककार गो.पु.देशपांडे समाज प्रबोधन पत्रिका ऑक्टोबर ते डिसेंबर २०१३
२. परिवर्तनाचा वाटसरू – १६ ते ३१ जुलै २०१२
३. परिवर्तनाचा वाटसरू – १ ते १५ ऑगस्ट २०१२